<u>सं. फौ. ख. क्र.३२८/२०२४</u> निशाणी १५

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – विजयसिंग श्रीरंग झाकर्डे

वय – ५८ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त सहा. पोलीस उपनिरीक्षक

पत्ता – रा. डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१९ ते २०२६ पर्यंत हवालदार व सहा. पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. दि.२०.०४.२०२४ रोजी मी कर्तव्यावर हजर असताना मी बिटमध्ये पेट्रोलिंग करीत असताना मला गुप्त बातमी मिळाली की, ग्राम अंत्री येथील वासुदेव मोतीराम डाबेराव हा त्याच्या घराच्या समोर गावठी हातभट्टीची दारु ही अवैधरित्या विक्री करीत आहे. सदर बातमीची माहिती आमच्या वरीष्ठांना दिली. तसेच मी, माझा रायटर रघुनाथ नेमाडे व दोन पंच असे मिळून मिळालेल्या बातमीची शहानिशा करण्याकरीता गेलो.

२. आम्ही ग्राम अंत्री येथे दुरुन वासुदेव डाबेराव याच्या घराच्या येथे पाहणी केली असता आम्हाला एका पांढ्या रंगाची कॅन वासुदेव डाबेराव याच्या हातामध्ये दिसून आली. त्यानंतर आम्ही त्याच्याकडे गेलो, व सदर पांढ्या कॅनमध्ये काय आहे, याबाबत विचारणा केली असता त्यानी काही सांगितले नाही. त्यामुळे आम्ही सदर कॅनचे झाकण पंचांसमक्ष उघडून पाहिले असता त्याचा आंबट आणि उग्र वास आला, त्यामध्ये हातभट्टी दारु असल्याची मला खात्री झाली. सदर कॅनमध्ये अंदाजे १० लि. दारु मिळून आली. त्यामधील १८० मि.ली. एका काचेच्या बाटलीमध्ये रासायनिक विश्लेषणाकरीता दोन पंचांसमक्ष वेगळी काढून घेतली व सदर बाटलीवर पंचांच्या व माझ्या सहीचे कागदी लेबल लावून त्यास लाखेचे सिल लावले. उर्वरीत मुद्देमाल पंचांसक्षम नाश केला.

३. त्यानंतर मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला. आता सदर घटनास्थळ पंचनामा त्यावर माझी, दोन पचांची सही आहे तसेच जप्ती पंचनामा

वर माझी, आरोपी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.१६ व १७** देण्यात येत आहे.

४. त्यानंतर आरोपीस पो.स्टे. येथे आणले. मी सदर आरोपीविरुध्द लेखी फिर्यादी दिली. आता मला सदर लेखी फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येत आहे.

५. आरोपीस सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने समजपत्र देण्यात आले. आता मला सदरचे समजपत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. सदर जप्त १८० मिलीची बाटली ही मालखान्यात जमा केली. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी व मालखाना कारवून यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येत आहे.

६. सदर नमुना म्हणून घेतलेली मुद्देमालाची बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती येथे पाठविली. आता मला सदर सि.ए. फॉर्म दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येत आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने मुद्देमालाचा अहवाल प्राप्त झाला तो सदर अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे वर्ग करण्यात आला. तपासकामी मी साक्षीदारांचे जबाब नोंद केले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याच्या विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी ओळखले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत उलटतपासः</u>**

७. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या आजूबाजूला इतर लोकांची घरे आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर लोकांची ये–जा सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पुर्व बाजूस देशमुखांचा वाडा आहे. अंत्री या गावची लोकसंख्या

अंदाजे ४०० ते ५०० आहे. घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत दस्त मी पाहिलेले नाहीत. घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता पंचांना लेखी नोटीस दिली नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, लेखी फिर्याद नोंद करण्यापुर्वी वरीष्ठांचा फिर्याद नोंद करण्याबाबत शेरा व सही घ्यावी लागते. आता मला माझी लेखी फिर्याद दाखविण्यात आली त्यावर संबंधित ठाणेदार यांची सही नाही. साक्षीदार सदर प्रश्नाच्या अनुषंगाने सांगतात की, पोलीस ठाणेदार हे गैरहजर असल्यामुळे त्यांची सही त्यावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, लेखी फिर्यादीखाली समक्ष म्हणून केलेली सही पोलीस प्रविण लाड यांची असून त्याखाली त्यांचे नाव नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर गुन्ह्याकामी कोणत्याही साक्षीदारांचे जबाब नोंद केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार घटनास्थळी नसल्यामुळे मी त्यांचे जबाब नोंद केलेले नाहीत.

९. हे म्हणणे खरे आहे की, गुन्ह्याचा तपास वर्ग करणेकामी पोलीस ठाणेदार लेखी आदेश पारीत करतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर गुन्ह्याचा तपास करणेकामी मला लेखी आदेश दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– १०.०८.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.08.10 17:26:27 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | १०/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १०/०८/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १०/०८/२०२६ |